जा.क्र.[illegible]/प्र.शा.तत्रंज्ञ/कंत्राटी/३८१/२०२२ दिनांक :- २९/१२/२०२२

कार्यालयीन आदेश :-

विषय :- कंत्राटी (मानधन) तत्वावर नेमणुका आदेश देणे बाबत...

संदर्भ :- या कार्यालयाची मंजुर टिपनी दिनांक:- २८/१२/२०२२

अधिष्ठाता, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर येथे प्रयोग शाळा तत्रंज्ञ या पदावर एक रकमी वेतन रु.१५,०००/-प्रति. महिना. खालील उमेदवारांना १२० दिवसासाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव व पद | कालावधी |
|---|---|---|
| १. | श्रीम. अंजूम इम्तियाज मेस्त्री, प्रयोग शाळा तत्रंज्ञ (कंत्राटी पद) तात्पुरते | दिनांक: ३१/१२/२०२२ ते २९/०४/२०२२ १२० दिवसाकरीता तात्पुरती नियुक्ती |

**सदरची नियुक्ती ही पुढील अटी वर देण्यात येत आहे.**

१) आपली नियुक्ती नियमानुसार तात्पुरत्या स्वरुपात असुन जर मा.संचालक वै.शि.व सं.मुंबई व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना सोसायटी, मुंबई यांच्या मान्यतेच्या अधिन राहून पूर्णतः तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे. आपले काम समाधानकारक असेल तरच आपली नेमणूक पुढे चालु ठेवण्याबाबत विचार करण्यात येईल.

२) आपल्याला पदग्रहण कालावधी अनुज्ञेय नाही. तसेच पदग्रहण करताना कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय नाही.

३) आपली नियुक्ती संपूर्णतः कंत्राटी पध्दतीने आहे. त्यामुळे आपल्या अगोदरच्या कोणत्या ही नियुक्तीचा कालावधी सेवेकरिता अगर इतरसेवा विषयक बाबीसाठी विचारात घेतली जाणार नाही.

४) आपल्या नियुक्तीचा कालावधी वर दर्शविल्याप्रमाणे राहील.नियुक्तीच्या कालावधीच्या समाप्तीनंतर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. समाप्तीसाठी वेगळे आदेश काढले जाणार नाहीत. तसेच जर आपण नियुक्ती नंतर सात दिवसांत रुजु झाला नाही, तर हे आदेश आपोआप रद्द समजण्यात येतील.

५) समाधानकारक असल्यास पुढील कालावधीसाठी वाढीवकालाचे आदेश देण्यात येतील.

६) सदरची नियुक्ती वैद्यकीय प्रमाणपत्र आणि चारित्र्य व वर्तणूक अहवालाच्या अधिन राहून करण्यात येत आहे. जर अहवाल प्रतिकूलप्राप्त झाल्यास तात्पुरती नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

७) सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन ती वर दर्शविलेल्या कालावधी पुरतीच असून आपणास पुर्ननियुक्ती करीता हक्क सांगता येणार नाही. तसेच आपल्या जागी इतर दुसऱ्या उमेदवाराची नियुक्ती करावयाची झाल्यास त्यास आपणास हरकत घेता येणार नाही. या नियुक्ती संदर्भात आपणास न्यायालयात दाद मागता येणार नाही. असे आपण रु. १००/- च्या स्टॅम्प पेपर वर वचननामा लिहुन द्यावा लागेल.

८) सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन त्यासाठी कोणत्याही प्रकारे राजकिय व अन्य पदाधिकारी यांचे कडून दबाव आणल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता आदेश तात्काळ समाप्त करण्यात येईल.

९) सदरचे आदेश प्राप्त होताच तात्काळ हजर रहाणेचे आहे, अन्यथा आपण सदर नोकरीसाठी इच्छुक नाही असे समजण्यात येईल. मुळप्रमाणपत्रांच्या अधिन राहून नेमणूक देण्यात येत आहे.

अधिष्ठाता,

Scanned with OKEN Scanner